मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 21 एप्रिल 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडमध्ये ओला कचरा स्वत: जिरवा; अन्यथा दंड

## महापालिकेचा इशारा; 100 किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील दररोज 100 किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या, रुग्णालये, हॉटेल्स, शैक्षणिक संस्था, मंगल कार्यालये, कॅण्टीन, वसतिगृह, कंपन्या आणि मोठ्या आस्थापनांना महापालिका आरोग्य विभागाने पुन्हा एकदा ओला कचरा स्वतःच्या परिसरातच जिरविण्याचा इशारा दिला आहे. एक एप्रिलपासून घनकचरा व्यवस्थापन नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी सुरू झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

केंद्र शासनाच्या 27 जानेवारी 2026 च्या अधिसूचनेनुसार, प्रतिदिन 100 किलोपेक्षा जास्त ओला कचरा निर्माण होणाऱ्या किंवा मोठ्या क्षेत्रफळ, पाण्याचा अधिक पाणी वापर असलेल्या आस्थापनांनी कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. नियमांचे पालन न केल्यास पहिल्यांदा 5 हजार रुपये, तर दुसऱ्यांदा 15 हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याला जाणार आहे. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, शहरातील 233 हाऊसिंग सोसायट्यांनी स्वतःच ओला कचरा जिरविण्याची व्यवस्था उभी केली आहे.

तयार होणारे खत त्यांच्या बागा आणि हरित पट्ट्यांसाठी वापरले जाते. मात्र, अजूनही 877 सोसायट्यांमधून महापालिकाच ओला कचरा उचलत आहे. सोसायट्यांमधून दररोज 288 टन कचरा निर्माण होत असल्याने, त्याचा ताण महापालिकेच्या यंत्रणेवर पडत आहे. वारंवार नोटीसा देऊनही कंपोस्ट खत प्लांट सुरू न केल्याने गेल्या वर्षभरात 101 हाऊसिंग सोसायट्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यात केवळ 35 हजार रुपये दंडाची वसुली झाली. यापूर्वीही नोटिसा, मुदतवाढ आणि काही ठिकाणी नळजोड तोडण्याच्या कारवाया करण्यात आल्या होत्या.




### कंपोस्ट खत प्रकल्प न उभारल्यास दंडात्मक कारवाई

» केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने 27 जानेवारी 2026 रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे या नियमात बसणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या व आस्थापनांना ओला कचरा जिरविणे बंधनकारक आहे. त्यांनी तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, असे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

### शहरातील अशी आहे सद्यःस्थिती

- » ओला कचरा स्वतः जिरवणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या : 233
- » महापालिका अजूनही कचरा उचलते त्या हाऊसिंग सोसायट्या : 877
- » वर्षभरात दिलेल्या नोटिसा : 101
- » वसूल दंड : 35 हजार रुपये
- » सोसायट्यांमधून दररोज निर्माण होणारा कचरा : 288 टन
- » ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती : 10 टक्के

### सहा वर्षांपासून रखडली अंमलबजावणी

» केंद्र व राज्य शासनाच्या आदेशानुसार सन 2019 पासून महापालिकेकडून या घनकचरा व्यवस्थापन नियमावलीची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यापूर्वी आरोग्य विभागाने सोसायट्यांना नोटिसाही बजावल्या होत्या. वेळोवेळी मुदत दिली. परंतु, हाऊसिंग सोसायट्या व राजकीय दबावातून कारवाईबाबत प्रशासनाने माघार घेतली. मागील वेळेत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी हस्तक्षेप करत ती सक्ती काही काळ रोखली होती. आता प्रशासनाने पुन्हा सोसायट्यांना इशारा दिला आहे.

# पिंपरी एसटी आगारात पाणीटंचाई; वर्कशॉपमधील स्वच्छतागृह सहा महिन्यांपासून बंद

## कर्मचाऱ्यांची गैरसोय; कामकाजावर परिणाम, तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) आगारातील वर्कशॉपमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून पाणीटंचाईची गंभीर समस्या असून, स्वच्छतागृह बंद ठेवण्यात आल्याने कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहेत. मूलभूत सुविधांच्या अभावामुळे कामकाजावर परिणाम होत असून, प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार कर्मचारी वर्गातून केली जात आहे.



वल्लभनगर परिसरातील या आगारामध्ये सध्या 50 एस. टी. बस आहेत. दररोज 31 बस फेऱ्या आगारातून सुटतात आणि तेवढ्याच बस परत येतात. याशिवाय दिवसभरात विविध आगारांमधील सुमारे 550 बस येथे ये-जा करतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक आणि देखभाल कार्य सुरू असताना वर्कशॉपमध्ये आवश्यक पाणीपुरवठा नसल्याने येथे कार्यरत कर्मचाऱ्यांना ऐन उन्हाळ्यात मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

वर्कशॉपमध्ये दररोज बसेसची तपासणी आणि दुरुस्तीची कामे केली जातात. ही कामे वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक असते. तपासणी, दुरुस्तीनंतरच बस प्रवाशांच्या सेवेसाठी मार्गस्थ होतात. मात्र, स्वच्छतागृह बंद असल्याने कर्मचाऱ्यांना सुमारे 200 ते 300 मीटर अंतर चालत जाऊन चालक-वाहकांसाठी असलेल्या विश्रांतीगृहातील स्वच्छतागृहांचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे कामात खंड पडतो आणि वेळेचा अपव्यय होत असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार वारंवार तक्रारी करूनही आगार प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# “सरकारचं करायचं काय”; आंदोलनात भाजपकडूनच घोषणाबाजी

## महिला आरक्षणाच्या समर्थनार्थ भाजपचे आंदोलन; घोषणांदरम्यान किरकोळ गोंधळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

काँग्रेस व इंडिया आघाडीचा महिलांच्या विरोधात भूमिका घेतल्याचा आरोप करीत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपकडून निषेध नोंदवण्यात आला. त्यानंतर भाजपसह महायुतीतील घटकपक्षाच्या नगरसेवकांनी महापालिका भवनाच्या प्रवेशव्दारावर निषेध आंदोलन केले. या आंदोलनात घोषणा देताना गोंधळलेल्या भाजप नगरसेवकांनी "या सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय" अशा आपल्याच सरकारविरोधातच घोषणाबाजी करण्याची चूक केली.

केंद्र सरकारकडून नारी शक्ती वंदन २०२३ मध्ये सुधारणा अधिनियम, सीमांकन आयोगाची स्थापना करण्यासाठी मतदारसंघाची पुनर्रचना आणि केंद्रशासित प्रदेशातील विधानसभांमध्ये महिला आरक्षण लागू करण्यासाठी विधेयक संसदेत मांडण्यात आले. परंतु, विधयकासाठी दोन तृतीयांश मते न पडल्यामुळे ते मागे घेण्याची नामुष्की केंद्र सरकारवर ओढावली. त्यावरून देशभरात सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहे. कोण कसे महिला विरोधी आहे, हे सांगितले जात आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये महापालिका सभेत निषेध करून भाजपकडून सभा तहकूब करण्यात आली त्यानंतर ममहापालिकेतील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना पक्षाकडून प्रवेशव्दारावर आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात भाजपच्या आमदार उमा खापरे, महापौर रवि लांडगे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी सहभागी झाले होते. मात्र, प्रशांत शितोळेंसह नगरसेवकांनी यावेळी सरकारविरोधातच घोषणाबाजी केली. "या सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय" अशा घोषणा दिल्या. चूक लक्षात येताच विरोधकांचा निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. मात्र, चुकीच्या घोषणा दिल्यावरून टिकेला सामोरे जाण्याची नामुष्की भाजप सत्ताधा-यांवर ओढावली आहे.



### महिला आरक्षणासाठी आंदोलन

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजप आणि महायुतीच्या नगरसेवकांनी महिला आरक्षणाच्या समर्थनार्थ निषेध नोंदवला. महिलांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे आणि त्यांचा सहभाग वाढावा, या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. महापालिका भवनाच्या प्रवेशद्वारावर घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी भूमिका मांडली. या वेळी अनेक नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. महिला सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारच्या भूमिकेला पाठिंबा देत आंदोलन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

### नेत्यांची उपस्थिती ठळक

» या आंदोलनात आमदार उमा खापरे, महापौर रवि लांडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्यासह अनेक नगरसेवक उपस्थित होते. महापालिका परिसरात मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि समर्थक जमले होते. महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर भाजपने ठाम भूमिका घेतल्याचे नेत्यांनी सांगितले. महिलांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. आंदोलन शांततेत पार पडले असून त्यानंतर कार्यकर्त्यांनी संघटित शक्तीचे प्रदर्शन केले.

### घोषणांमध्ये किरकोळ गोंधळ

» आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करताना काही कार्यकर्त्यांकडून घोषणांमध्ये किरकोळ गोंधळ झाला. काही क्षणांसाठी चुकीची घोषणा दिल्यानंतर लगेचच ती दुरुस्त करण्यात आली. त्यानंतर विरोधकांविरोधात आणि महिला आरक्षणाच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्या. कार्यक्रमात उपस्थित नेत्यांनी हा प्रकार क्षुल्लक असल्याचे सांगत मुख्य मुद्दा महिला सक्षमीकरणाचा असल्याचे स्पष्ट केले. आंदोलनात उत्साहाचे वातावरण होते आणि मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.

---

# प्रदूषणाला कारणीभूत ‘आरएमसी’ प्रकल्पाला टाळे...

## पालिकेच्या उपद्रव शोध पथकाने धडक मोहीम राबवून धूळ नियंत्रण यंत्रणा नसलेल्या सात रेडी मिक्स काँक्रीट प्रकल्पांवर सील ठोकण्याची कारवाई केली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उपद्रव शोध पथकामार्फत शहरातील रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांची तपासणी मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान १२ प्रकल्पांची पाहणी करण्यात येऊन पर्यावरणीय नियम व मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारे सात प्रकल्प लाखबंद (सील) करण्यात आले.

महापालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत शहरातील वाढत्या वायुप्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. बांधकाम व औद्योगिक आस्थापनांकडून होणाऱ्या धूलिकणांच्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी नियमित तपासणी आणि धडक कारवाया सुरू आहेत. याच अनुषंगाने महापालिकेच्या उपद्रव शोधपथकामार्फत शहरातील 'आरएमसी' प्रकल्पांची तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण १२ प्रकल्पांची पाहणी करण्यात आली. तपासणीदरम्यान पर्यावरणीय नियम व मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या सात प्रकल्पांवर लाखबंदीची कारवाई केली.

वायुगुणवत्ता सुधारण्यासाठी विविध स्तरांवर उपाययोजना राबविल्या जात आहेत. औद्योगिक, तसेच बांधकाम प्रकल्पांमधून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहिमा हाती घेतल्या जात आहेत. नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी अशा कारवायांना पुढील काळातही अधिक गती दिली जाईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिका मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले.

आरएमसी आणि बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करणे अनिवार्य आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड न करता तत्काळ कारवाई केली जात आहे. पुढील काळातही तपासणी मोहीम राबवून प्रदूषण करणाऱ्या घटकांवर कडक कारवाई केली जाईल, असे कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांनी सांगितले.



### गंभीर त्रुटी

» या प्रकल्पांमध्ये धूळ नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा नसणे, परिसरात पाण्याची फवारणी न करणे, उघड्यावर साहित्य साठवणे, तसेच, धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभाव आदी गंभीर त्रुटी आढळून आल्या. उर्वरित पाच प्रकल्पांमध्येही काही त्रुटी निदर्शनास आल्याने संबंधितांना कडक इशारा देण्यात आला आहे.

# पुणे 'ग्लोबल सिटी'कडे; महापालिकेचा महत्त्वाकांक्षी विकास आराखडा

## 1 रुपयात उपचार, स्टार्टअप सेंटर, डेटा सेंटरसह वाहतूक व पायाभूत सुविधांमध्ये मोठे बदल

**पुणे | प्रतिनिधी**

विद्येचे माहेरघर व आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याचा कायापालट करण्यासाठी महापालिकेने कंबर कसली आहे. आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि तंत्रज्ञान, अशा सर्वच आघाड्यांवर पुणेकरांना जागतिक दर्जाच्या सुविधा पुरविण्यासाठी एक व्यापक विकास आराखडा तयार करण्यात आला आहे.

1 रुपयात अद्ययावत उपचार, महिलांना मालमत्ता करात 50 टक्के सवलत, स्टार्टअपसाठी मोफत इन्क्युबेशन सेंटर आणि देशातील पहिले महापालिका डेटा सेंटर, अशा अनेक प्रकल्पांमुळे पुण्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळणार आहे. महापालिकेच्या या 'सुपर व्हिजन' मुळे पुणे 'ग्लोबल सिटी'च्या दिशेने झेपावणार आहे, असा विश्वास व्यक्त करीत महत्त्वाचे प्रकल्प सहा महिन्यांत पूर्ण करणार, असा संकल्प महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी व्यक्त केला.

या वेळी त्यांनी आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञान, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांबाबतच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. आरोग्य विभागाबाबत बोलताना भिमाले यांनी सांगितले की, शहरातील सहा प्रसूती रुग्णालये (मॅटर्निटी हॉस्पिटल्स) कॉर्पोरेट दर्जाची केली जात आहेत. दळवी, कमला नेहरू यांसारख्या रुग्णालयांत आयसीयू, अद्ययावत ऑपरेशन थिएटर आणि विशेष 'डॅशिंग डॅशबोर्ड' प्रणाली असेल, ज्यामुळे रुग्णांना मिळणाऱ्या उपचारांवर थेट लक्ष ठेवता येईल.

विशेष म्हणजे, या सुविधा केवळ 1 रुपयात उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच, बाणेर येथे पीपीपी तत्त्वावर देशातील अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालय उभारण्यात येत असून, तिथे महागड्या चाचण्या आणि उपचार केवळ 20 टक्के दरात मिळतील. भिमाले म्हणाले, महापालिका स्वतःचे 'डेटा सेंटर' उभारणारी देशातील पहिली महापालिका ठरणार आहे. यामुळे महापालिकेचा सर्व गोपनीय डेटा सुरक्षित राहील. तंत्रकुशल तरुणांसाठी भिमाले यांनी अमेरिकन कंपन्यांच्या सहकार्याने 1000 विद्यार्थी क्षमतेचे मोफत 'स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटर' जाहीर केले आहे. तिथे प्रशिक्षण घेणाऱ्या इंजिनिअर्सना थेट नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.



### 'सावित्री'तून 25 टीएमसी पाणी आणण्याच्या योजनेचा

» पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येसाठी केवळ मुळशी धरणाचे पाणी पुरेसे ठरणार नाही. त्यामुळे मुळशी धारणातूनच नाही, तर महाडच्या सावित्री नदीतून 25 टीएमसी पाणी उचलण्याच्या कधीकाळी मांडण्यात आलेल्या योजनेचा अभ्यास करून याबाबत पाठपुरावा करणार असल्याचे भिमाले यांनी सांगितले. यासोबतच शहरात वाघोली, मांजरी भागांत ड्रेनेजचे जाळे आणि 11 नवीन एसटीपी प्लांटचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यातील 9 एसटीपी लवकरच सुरू केले जाणार आहे. तर शहरातील 'रिव्हर फ्रंट' प्रकल्प पुढच्या सहा महिन्यांत पूर्ण करून पुणेकरांना पर्यटनासाठी एक मोठी भेट दिली जाणार असल्याचे भिमाले यांनी सांगितले.

### सहा महिन्यांत बदलणार पुण्याचे चित्र

» पुणे महापालिकेने शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाकांक्षी आराखडा तयार केला आहे. आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांत मोठे प्रकल्प राबवले जाणार आहेत. शहरातील सहा प्रसूती रुग्णालये कॉर्पोरेट दर्जाची केली जाणार असून १ रुपयात उपचार सुविधा उपलब्ध होणार आहे. महिलांना मालमत्ता करात ५० टक्के सवलत, स्टार्टअपसाठी मोफत इन्क्युबेशन सेंटर आणि देशातील पहिले महापालिका डेटा सेंटर उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. हे सर्व प्रकल्प पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.

### शहर वाहतूक कोंडीमुक्त करणार

» वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून पीएमपीच्या ताफ्यात 2500 नवीन बस दाखल होत आहेत. पर्वती ते पेशवे पार्कदरम्यानचा 'रोप-वे', येरवडा ते कात्रज असा 14.5 किमीचा भुयारी मार्ग आणि मल्टिस्टोरी पार्किंगच्या माध्यमातून शहर कोंडीमुक्त करण्याचा प्रयत्न आहे, असे भिमाले यांनी सांगितले.

---

# हिंजवडी आयटी पार्क परिसरात आठवडाभर वाहतूक कोंडीची शक्यता

## विप्रो सर्कल ते MIDC सर्कल मार्गावर मर्यादित वाहतूक; नागरिकांना पर्यायी मार्गांचा सल्ला

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्क परिसरात प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी महत्त्वाची वाहतूक सूचना जारी करण्यात आली असून, विप्रो सर्कल ते एमआयडीसी सर्कल (फेज-२) या मार्गावर सध्या वाहतुकीवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. हिंजवडी ट्रॅफिक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मेट्रो स्टेशन क्रमांक खाली, डोहलर कंपनीसमोरचा रस्ता सध्या एकाच बाजूने खुला ठेवण्यात आला आहे.

या ठिकाणी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनीच्या केबलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी रस्त्याचे उत्खनन सुरू असून, त्यामुळे संपूर्ण मार्गावर केवळ एकाच लेनमधून वाहतूक सुरू आहे. परिणामी, या भागात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता वाढली आहे.

विशेषतः सकाळी ८ ते ११ आणि संध्याकाळी ४ ते ८ या वेळेत मोठ्या प्रमाणावर वाहनांची गर्दी अपेक्षित असल्याने नागरिकांनी शक्य असल्यास पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे. आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी प्रवासाचे नियोजन करून लवकर निघावे किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, असेही सूचित करण्यात आले आहे.

दरम्यान, केबल दुरुस्तीचे काम वेगाने सुरू असून ते २६ एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तोपर्यंत या मार्गावर वाहतूक मर्यादित स्वरूपातच सुरू राहणार असल्याने नागरिकांनी संयम बाळगून सहकार्य करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

हिंजवडीसारख्या गजबजलेल्या आयटी हबमध्ये अशा प्रकारच्या कामांमुळे होणाऱ्या वाहतूक बदलांचा मोठा परिणाम दैनंदिन प्रवासावर होतो. त्यामुळे प्रशासनाने वाहतूक नियोजन अधिक प्रभावी करण्याबरोबरच पर्यायी मार्गांबाबत स्पष्ट मार्गदर्शन देणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



### हिंजवडीकरांसाठी महत्त्वाची सूचना

» हिंजवडी आयटी पार्क परिसरातील विप्रो सर्कल ते एमआयडीसी सर्कल (फेज-२) या मार्गावर केबल दुरुस्तीमुळे वाहतूक एकाच लेनमधून सुरू आहे. त्यामुळे सकाळी ८ ते ११ आणि संध्याकाळी ४ ते ८ या वेळेत मोठी कोंडी होण्याची शक्यता आहे. वाहनचालकांनी शक्य असल्यास पर्यायी मार्गांचा वापर करावा. आयटी कर्मचाऱ्यांनी वेळेआधी घरातून निघावे किंवा सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय निवडावा. दुरुस्तीचे काम २६ एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असून तोपर्यंत नागरिकांनी संयम ठेवून प्रशासनाला सहकार्य करावे.

# वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांच्या हाती थेट चलन

## पुणे पोलिसांचा आयटीएमएस प्रकल्प अंतिम टप्प्यात; 32 महत्त्वाच्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडीतून पुणेकरांची होणार सुटका.

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक व्यवस्था सुरळित करण्यासाठी पोलिसांनी हाती घेतलेला इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम (आयटीएमएस) प्रकल्प अंतिम टप्प्यात असून आता वाहतूक नियम मोडणाऱ्यांच्या हाती थेट नियमभंगाचे चलन पडणार असल्याचे पुणे पूर्व विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी सांगितले. सॉफ्टवेअर एक्स्पोर्टर्स असोसिएशन ऑफ पुणे (सीप) तर्फे आयोजित केलेल्या पुणे सोशल इम्पॅक्ट डायलॉग कार्यक्रमावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला ग्लोबल सस्टेनिबिलिटी इम्पॅक्ट कोच आणि सेवा ब्रिज फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण डी. एम, पिनॅकल इंडस्ट्रीजचे आणि ईकेए मोबिलिटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुधीर मेहता, क्लायमट ट्रूपर्स फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नटराजन, सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या मेडिकल- हेल्थ सायन्स विभागाचे कुलसचिव प्रो. राजीव येरवडेकर, सीपचे अध्यक्ष शिवराज साबळे, उपाध्यक्ष शिवेश विश्वनाथ, माजी अध्यक्षा विनिता गेरा, व्यवस्थापकीय समिती सदस्य बालचंद्र नामजोशी, ईएसजी विभागाच्या अवंती कदम उपस्थित होते.

पाटील म्हणाले, १९९५ मध्ये पुण्यात ८६ चौरस किमी रस्ते होते. २०२५ मध्ये ती संख्या ३७३ चौ. किमी झाली आहे. त्यामध्ये ३३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वाहनांच्या वेगाच्या मर्यादेमध्ये जागतिक पातळीवर पुण्याचा क्रमांक पाचवा आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरणाऱ्यांचे प्रमाण पुण्यात ११ टक्के आहे. २०१२ मध्ये पीएमपीचा वापर करणारे १२ लाख लोक होते. आजही हा आकडा बदलेला नाही.

मेट्रोचा वापर करणारे लोक तीन लाखांपर्यंत आहेत. पुण्यामध्ये खासगी वाहनांची संख्या ७८ लाखांपर्यंत पोहचली आहे. आयटीएमएस कार्यान्वीत झाल्यावर नियम मोडणाऱ्या वाहनचालकांना थेट चलन मिळेल. शहरातील ३२ महत्वाच्या रस्त्यावर काम सुरु केले आहे. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या कमी होईल, असेही पाटील म्हणाले. सूत्रसंचालन पूजा कुलकर्णी यांनी केले. शिवेश विश्वनाथ यांनी आभार मानले.



### नियम मोडला तर थेट ई-चलन

» ITMS कार्यान्वित झाल्यानंतर वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांच्या नोंदणीकृत मोबाईलवर थेट ई-चलन पाठवले जाणार आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवायही कारवाई शक्य होणार आहे. या व्यवस्थेमुळे नियमभंग करणाऱ्यांवर नियंत्रण येईल आणि दंड प्रक्रियेत पारदर्शकता वाढेल. तसेच नागरिकांना वेळेत दंड भरता येणार असल्याने त्रासही कमी होणार आहे.

### ITMS म्हणजे काय?

» इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम (ITMS) हा आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प असून शहरातील वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी तो राबविण्यात येत आहे. या प्रणालीत सीसीटीव्ही कॅमेरे, सेन्सर्स आणि ऑटोमेटेड सॉफ्टवेअरच्या मदतीने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची नोंद होणार आहे. सिग्नल तोडणे, वेगमर्यादा ओलांडणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे यांसारख्या प्रकारांवर तत्काळ कारवाई केली जाणार आहे.

### पुण्यात ७८ लाख खासगी वाहने

» पुणे शहरात खासगी वाहनांची संख्या तब्बल ७८ लाखांपर्यंत पोहोचली असून त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणाऱ्यांचे प्रमाण फक्त ११ टक्के आहे. मेट्रोचा वापर सुमारे तीन लाख नागरिक करतात. शहरातील ३२ महत्त्वाच्या रस्त्यांवर सुधारणा कामे सुरू असून ITMS सुरू झाल्यानंतर वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेचा 'जागतिक गौरव'...

## पुणेरी स्टार्टअपची कमाल! वारी संस्कृतीचा जागतिक गौरव; स्वप्नील मोरे यांना मानाचा पुरस्कार.

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राची समृद्ध वारकरी परंपरा आणि एकविसाव्या शतकातील प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांचा अभूतपूर्व संगम असलेल्या 'छोटा वारकरी' हा उपक्रम सध्या तंत्रज्ञान विश्वात चर्चेचा विषय ठरत आहे.

या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोगासाठी पुण्याच्या वारीव्हर्स स्टुडिओज या स्टार्टअपने 'मास्टर्स युनियन नेक्स्ट टेक १.० एआय शिखर परिषद' मध्ये मानाचा 'क्रिएटिव्ह ल्यूमिनरी अॅवॉर्ड पटकावला आहे. वारीव्हर्स स्टुडिओजचे संस्थापक स्वप्नील मोरे आणि सह-संस्थापक पूजा मोरे यांना या जागतिक स्तरावरील व्यासपीठावर सन्मानित करण्यात आले.

या स्टार्टअपच्या 'छोटा वारकरी' या उपक्रमाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. शतकानुशतके चालत आलेली अभंगवाणी, संतांचे विचार आणि वारकरी संस्कार नव्या पिढीला समजेल अशा रंजक भाषेत मांडण्यासाठी मोरे यांनी एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'छोटा वारकरी' या अभिनव ॲनिमेशन व्यक्तिरेखेचे उद्घाटन नुकतेच झाले होते.

या यशाबद्दल बोलताना स्वप्नील मोरे म्हणाले, 'हा सन्मान केवळ आमचा नसून संपूर्ण वारकरी परंपरेचा आहे. 'याचा धरीन अभिमान, करीन आपुले जतन' या उक्तीप्रमाणे आपली संस्कृती जागतिक स्तरावर नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. एआय हे केवळ साधन नसून ते भविष्यातील संवादाचे सशक्त माध्यम आहे.'

पूजा मोरे म्हणाल्या, 'छोटा वारकरी हा आमच्यासाठी केवळ एक प्रकल्प नाही. तर, तो एक भावनिक प्रवास आहे. या पुरस्कारामुळे आम्हाला अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.'

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात कार्यरत असलेल्या वारीव्हर्स स्टुडिओजला भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया उपक्रमांतर्गत मान्यता मिळाली आहे. भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी तंत्रज्ञानाचा असा वापर हे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पडलेले महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.





### काय आहे 'छोटा वारकरी' संकल्पना?

» गेल्या १५ वर्षांपासून 'फेसबुक दिंडी' आणि 'व्हर्च्युअल दिंडी' च्या माध्यमातून वारीचा प्रचार करणारे स्वप्नील मोरे यांनी या संकल्पनेची निर्मिती केली आहे. युवा पिढीला आपल्या मुळांशी जोडण्यासाठी 'छोटा वारकरी' या पात्राची निर्मिती करण्यात आली आहे. एआय आधारित कथाकथन, ॲनिमेशन आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून लहान मुलांवर आध्यात्मिक व नैतिक संस्कार करण्याचे कार्य हे स्टार्टअप करत आहे. केवळ मनोरंजन नाही, तर मूल्यांची जोपासना हा यामागचा मुख्य उद्देश आहे.